ISBN 978-93-5780-325-0



रयत शिक्षण संस्थेचे,

# बळवंत कॉलेज, विटा

ता. खानापूर, जि. सांगली

अर्थशास्त्र विभाग आयोजित

# शिवार्थ

## स्मरणिका 2023

ORGANIC CHICKENFARM

- कुक्कुटपालनाचे अर्थशास्त्र
- आभासी चलन भास, आभास आणि वास्तव

३३ वे

शिवाजी युनिव्हर्सिटी
इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर (सुयेक)

## वार्षिक अधिवेशन

रविवार, दि. २६ फेब्रुवारी, २०२३

ISBN 978-93-5780-325-0

रयत शिक्षण संस्थेचे,

# बळवंत कॉलेज,विटा

ता. खानापूर, जि. सांगली

## शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संलग्न

आयोजित

शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन,कोल्हापूरचे (सुयेक)

33 वे वार्षिक अधिवेशन

रविवार,दि.२६ फेब्रुवारी,२०२३

# शिवार्थ

## स्मरणिका 2023

■ स्मरणिका अंक २१ वा ■

## भाग- 1

• स्वागताध्यक्ष •

**डॉ. राजेंद्र मोरे**

प्राचार्य, बळवंत कॉलेज, विटा

प्रमुख संपादक शिवार्थ

**डॉ. जयवंत इंगळे**

स्थानिक संपादक

**डॉ. प्रवीण बाबर**

स्थानिक कार्यवाहक

**प्रा. प्रशांत गांजवे**

 ISBN: 978-93-5780-325-0


| | | | |
|---|---|---|---|
| 20 | Dr. S. T. Kombde*<br>Lalita Dattatray Jagtap** | Role Of Women In The Development Of Poultry And Livestock Sector | 129-134 |
| 21 | Dr. S. T. Kombde*<br>Dr. D. R. Nanaware** | Analysis Of Production And Export Performance Of Indian Poultry Industry | 135-144 |
| 22 | Dr. Satish Vyavahare | Growth And Development Of Poultry Production In India | 145-153 |
| 23 | प्रा (डॉ) एम. एस. देशमुख | जागतिक कुक्कुटपालन व्यवसायाची सद्यस्थिती व भारताचे योगदान | 154-160 |
| 24 | गणेश आदिनाथ टेकळे | कुक्कुटपालन व्यवसायाचे व्यवस्थापन | 161-164 |
| 25 | प्रा. खराडे निकिता सुनिल | कुकुट पालन आणि व्यवस्थापन चिकित्सक अभ्यास | 165-168 |
| 26 | प्रा. डॉ. प्रशांत फडणीस, | कुक्कुट पालन आर्थिक व सामाजिक विकास आणि वस्तुस्थिती पाटण तालुका | 169-172 |
| 27 | प्रा. डॉ. जे. एस. इंगळे | कुक्कुट पालन व्यवसायातील अंडी व मांस उत्पादन,उपभोग आणि निर्यात : समस्या व उपाय | 173-184 |
| 28 | हेमलता हरिभाऊ पाटील | कोकणातील (रायगड जिल्हातील )कुक्कुटपालन आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण | 185-192 |
| 29 | प्रा.डॉ. बाळासाहेब कोंडीबा माने | कुक्कुटपालन : ग्रामीण विकासातील महत्त्व | 193-201 |
| 30 | प्रा. डॉ. शंकर पांडूरंग हजारे | कुक्कुटपालनाचे अर्थशास्त्रय | 202-207 |
| 31 | डॉ. धेडे डी. आर. | "कोंबडयांच्या विविध जातींचा अभ्यास" | 208-216 |
| 32 | कु. यास्मीन हारुण मुल्ला | "हेरवाड गावातील बाणदार पोल्ट्री फार्मचा आर्थिक अभ्यास" | 217-222 |
| 33 | राजगुरू रितुजा अरुण*<br>बिचकर पुष्पेंद्र रामचंद्र** | कुकुटपालन व्यवसाय व्यवस्थापन | 223-229 |
| 34 | कुंभार प्राजक्ता शामसुंदर | कुक्कुटपालन व्यवसायातील नवे प्रवाह | 230-236 |
| 35 | प्रा.किरण तानाजी यादव | कुक्कुटपालन आणि ग्रामीण महिला सबलीकरण | 237-239 |
| 36 | स्वप्नाली गोरे | फायद्याचा जोडधंदा : कुक्कुटपालन | 240-241 |
| 37 | नेहा संजय साळुंखे | ग्रामीण भागातील कुक्कटपालनाचा विकास | 242-242 |
| 38 | Dr. Asmita Pradhan | कुक्कुटपालन आणि महिला सबलीकरण | 243-248 |
| 39 | डॉ. रमजान फत्तुखान मुजावर | भारतातील कुक्कुटपालन व्यवसाय | 249-255 |
| 40 | डॉ. संतोष मोटेगावकर*<br>कु. स्मिता भिवा रणदिवे** | कुक्कुटपालनाचे अर्थशास्त्र | 256-259 |
| 41 | डॉ. सोमनाथ विष्णु काळे, | भारतातील पोल्ट्री उत्पादन : एक दृष्टीक्षेप | 260-262 |
| 42 | डॉ.शेडगे दत्तात्रय भगवानराव | कुक्कुटपालन एक रोजगारवर्धकउद्योग व्यवसाय | 263-275 |
| 43 | सोनाली शंकर साळुंखे. | "गिरीराज कुकूटपालन स्वयंरोजगाराचे साधन" | 276-277 |
| 44 | फरदीन फारूक जमादार*<br>प्राजक्ता जयवंत पोळ** | परसातील कुक्कुटपालन - फायदेशीर जोड व्यवसाय | 278-281 |
| 45 | जयमाला अर्जुन उथळे | भारतातील कुक्कुटपालन व्यवसायाच्या संभाव्यता आणि समस्या | 282-284 |
| 46 | प्राचार्य डॉ. डी. के. पाटील. | ग्रामीण रोजगार निर्मितीत गावरान कोंबडी पालन आणि अंडी उत्पादनाचे योगदान | 285-293 |
| 47 | प्रा. प्रकाश शिंदे | भारतीय अर्थव्यवस्थेत कुक्कुटपालन या उद्योगाची भूमिका | 294-297 |
| 48 | प्रा. डॉ. प्रकाश यशवंत बुरुटे | कुक्कुटपालन व्यवसाय: अर्थार्जनाची संधी | 298-302 |
| 49 | प्रा. डॉ. भोगे दिगंबर भागवत | भारतीयों कुक्कुटपालनाची जागतिक स्पर्धाक्षमता | 303-307 |
| 50 | प्रथमेश रावसाहेब काटकर | ग्रामीण विकासातील कुक्कुटपालनाची भूमिका | 308-310 |

 ISBN: 978-93-5780-325-0

# भारतातील पोल्ट्री उत्पादन : एक दृष्टीक्षेप

***डॉ. सोमनाथ विष्णु काळे,***
***सहाय्यक प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग,विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)***

**घोषवारा :**

पोल्ट्री मांस (मटन) हा जगातील मांसाच्या मागणीचा सर्वात वेगाने वाढणारा घटक आहे. जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा विकसनशील देश असलेल्या भारतात पोल्ट्री क्षेत्रात वेगाने वाढ होत आहे. ब्रॉयलर उत्पादनात भारत हा पाचव्या क्रमांकाचा देश आहे. भारतातील शेती आणि संबंधित क्षेत्रापैकी पोल्ट्री उद्योगाने सर्वाधिक वेगवान वाढ साध्य केली आहे. कृषी पिकांचे उत्पादन प्रतिवर्षी १.५% ते २% दराने वाढत असताना अंडी आणि बॉयलर उत्पादन वाढीचा दर मात्र ८% ते १०% इतका आहे. देशाच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादना (GDP) मध्ये पोल्ट्री क्षेत्राचा वाटा १% तर पशुधनाचा वाटा ११.७९% इतका आहे. पशुसंवर्धन विभागाने तयार केलेल्या कृती आराखड्यानुसार (२०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी) भारतातील पोल्ट्री क्षेत्राचे मूल्य सुमारे १,००,००० कोटी रुपये इतके आहे. भारतातील पोल्ट्री उत्पादन सन २०२० च्या दशकामध्ये लक्षणीयरित्या वाढल्याचे दिसून येते. सन २००९-१० मध्ये एकूण पोल्ट्री उत्पादन २.०८ द.ल. टनांवरून २०१९-२० मध्ये ४.०६ द.ल. टनापर्यंत म्हणजे जवळपास दुपटीने वाढल्याचे दिसून येते.

**प्रस्तावना :**

भारतात गेल्या काही वर्षात सरासरी उत्पन्न वाढ व लोकसंख्येतील वाढ यामुळे कुकूटपालनाच्या मागणीत लक्षणीय वाढ होत आहे. पोल्ट्री मांस (मटन) हा जगातील मांसाच्या मागणीचा सर्वात वेगाने वाढणारा घटक आहे. जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा विकसनशील देश असलेल्या भारतात पोल्ट्री क्षेत्रात वेगाने वाढ होत आहे. ब्रॉयलर उत्पादनात भारत हा पाचव्या क्रमांकाचा देश आहे. भारतात एकात्मिक पोल्ट्री उत्पादन करणाऱ्या उत्पादकांचा उदय झाल्यामुळे उत्पादनात मोठया प्रमाणात वाढ होऊन पोल्ट्री उत्पादनाचा सरासरी खर्च व विपणन खर्च कमी होण्यास मदत झाली आहे. भारतातील १५ प्रमुख शहरांमध्ये पोल्ट्री मांसाचा ५२% उपभोग घेतला जातो.

कुकुट मांस हा प्रथिनांचा महत्त्वाचा स्त्रोत आहे. पोल्ट्री मांसातून लोकांना प्रथिने जीवनसत्वे आणि खनिजे (लोह, सेलेनियम, जस्त आणि ब जीवनसत्व मिळतात) तसेच हे व्हिटॅमिन बी 12 च्या मुख्य स्त्रोतापैकी एक आहे. कोंबडीच्या मांसाचे अनेक फायदे आहेत. चिकन मांसाकडे निरोगी मांस म्हणून पाहिले जाते. कोरोनरी हृदयरोगास कारणीभूत असणारे ट्रान्स फॅट कोंबडीच्या मांसामध्ये नसतात. तसेच हे कोंबडीचे मांस ओमेगा थ्री ऍसिड चा महत्वाचा स्त्रोत आहे. अनेक पोल्ट्री उद्योजकांनी पोल्ट्री व्यवसायासाठी नवीन प्रक्रिया सयंत्र उभारले आहेत. दर्जेदार उत्पादनांच्या मागणीतील वाढीमुळे या उद्योगात चांगला विकासदर साध्य करण्यास मदत होईल.

भारतातील शेती आणि संबंधित क्षेत्रापैकी पोल्ट्री उद्योगाने सर्वाधिक वेगवान वाढ साध्य केली आहे. कृषी पिकांचे उत्पादन प्रतिवर्षी १.५% ते २% दराने वाढत असताना अंडी आणि बॉयलर उत्पादन वाढीचा दर मात्र ८% ते १०% इतका आहे. भारतीय पशुसंवर्धन विभागाने जारी केलेल्या मूलभूत पशुसंवर्धन आकडेवारी (वर्ष- २०१९ नुसार) २०१९-२० मध्ये कुक्कुट मांस उत्पादन ४.०६ दशलक्ष टन इतके नोंदवले गेले आहे. मागील वर्षाची तुलना करता ही वाढ ७.८% इतकी आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या जवळपास ६० द.ल. पेक्षा अधिक लहान व मध्यम शेतकऱ्यांना या क्षेत्राने रोजगार उपलब्ध करून दिला आहे. यामध्ये मुख्यतः मोठ्या प्रमाणावर केल्या जाणाऱ्या एकत्रित कंत्राटी शेती पद्धतीत गुंतलेले शेतकरी समाविष्ट आहेत. जनगणनेनुसार सुमारे ३० लाख शेतकरी घरगुती कुक्कुटपालनात गुंतलेले दिसून येतात.

देशाच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादना (GDP) मध्ये पोल्ट्री क्षेत्राचा वाटा १% तर पशुधनाचा वाटा ११.७९% इतका आहे. पशुसंवर्धन विभागाने तयार केलेल्या कृती आराखड्यानुसार (२०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी) भारतातील पोल्ट्री क्षेत्राचे मूल्य सुमारे १,००,००० कोटी रुपये इतके आहे. भारतातील कुक्कुटपालन क्षेत्राला ढोबळमानाने दोन घटकांमध्ये विभागले जाते. त्यामध्ये एक म्हणजे व्यावसायिक क्षेत्र आणि दुसरे म्हणजे घरगुती कुक्कुटपालन. यामध्ये एकूण बाजारपेठेतील उत्पादनापैकी व्यावसायिक क्षेत्राचा वाटा सुमारे ८०% इतका आहे तर घरगुती कुकुटपालनाचा बाजारातील वाटा नगण्य म्हणजे २०% इतका आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

या संशोधनपर अभ्यासाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. भारतातील पोल्ट्री व्यवसायाचा अभ्यास करणे.
२. कोविड-१९ व रशिया युक्रेन युद्धाचा भारतातील पोल्ट्री व्यवसायावर झालेला परिणाम अभ्यासणे.

**तथ्य संकलन :**

हा अभ्यास करण्यासाठी केवळ दुय्यम सामग्री वापरली आहे. तसेच या अभ्यासासाठी आवश्यक असलेली आकडेवारी संकलित करण्यासाठी सरकारी कार्यालयांची वेबसाईट, संबंधित कार्यालयांचे वार्षिक अहवाल, संशोधनपर लेख, वर्तमानपत्रे इ. चा वापर केला आहे.

 ISBN: 978-93-5780-325-0

**भारतातील पोल्ट्री उत्पादन :**

**तक्ता १ :** भारतातील एकूण पोल्ट्री उत्पादन (सन २००९-१० ते २०१९-२०)

| अ.क्र. | वर्ष | उत्पादन |
|---|---|---|
| १ | २००९१०- | २०८. |
| २ | २०१०११- | २१९. |
| ३ | २०१११२- | २४८. |
| ४ | २०१२१३- | २६८. |
| ५ | २०१३१४- | १९२. |
| ६ | २०१४१५- | ३१५. |
| ७ | २०१५१६- | ३२६. |
| ८ | २०१६१७- | ३४६. |
| ९ | २०१७१८- | ३७६. |
| १० | २०१८१९- | ३६२. |
| ११ | २०१९२०- | ४०६. |
| **स्त्रोत** :Department of animal husbandry | | |

भारतातील पोल्ट्री उत्पादन सन २०२० च्या दशकामध्ये लक्षणीयरित्या वाढल्याचे दिसून येते. सन २००९-१० मध्ये एकूण पोल्ट्री उत्पादन २.०८ द.ल. टनांवरून २०१९-२० मध्ये ४.०६ द.ल. टनापर्यंत म्हणजे जवळपास दुपटीने वाढल्याचे दिसून येते.

**लॉकडाऊन चा पोल्ट्री उद्योगावर झालेला परिणाम :**

भारतात कोविड-19 चे पहिले प्रकरण समोर येण्यापूर्वीच पोल्ट्री पक्षांच्या विषाणूचा संभाव्य वाहक म्हणून सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणामध्ये पसरलेल्या अफवामुळे देशातील अनेक भागांमध्ये विशेषत: फेब्रुवारी २०२० मध्ये कोंबडीच्या मांसाची मागणी बरीच कमी झाली होती. कोंबडीचे मांस पूर्णपणे सुरक्षित असल्याचे स्पष्टीकरण वेगवेगळ्या एजन्सीजने जारी केले कोविड-१९ विषाणूचा झपाट्याने होणारा प्रसार रोखण्यासाठी देशव्यापी लॉकडाऊन करण्यात आले. त्यामुळे भारतातील पोल्ट्री उद्योगाला मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. सरकारने केलेल्या लॉकडाऊन मुळे संपूर्ण पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे.

विशेषत: गेल्या दोन दशकांत प्रथिनेयुक्त खाद्यपदार्थांच्या ग्राहकांच्या वाढत्या मागणीमुळे ज्या पोल्ट्री उद्योगाने स्थिर विकास दर साध्य केला होता त्याला सन २०२० सालच्या सुरुवातीपासूनच मोठा तोटा सहन करावा लागत आहे. मागणीतील घट, प्राप्ती मधील घट आणि नफ्यामध्ये घट या कारणामुळे भारतीय पोल्ट्री उद्योगाला तीव्र स्वरूपाचा तोटा सहन करावा लागला.

पोल्ट्री किंमत साखळीतील सर्व संबंधित घटक – शेतकरी, खाद्य पुरवठादार आणि किरकोळ विक्रेते यांची तरलतेची स्थिती अत्यंत अनिश्चित स्वरूपाची राहिली होती. मागणीतील घट आणि पुरवठा साखळीतील व्यत्ययाचा अनेक पोल्ट्री उत्पादकांना विशेषतः लहान उत्पादकांना खूप फटका बसला. त्यामुळे यातील अनेक युनिट्स बंद पडले. मे २०२० पर्यंत या व्यवसायाचे भवितव्य अंधकारमय होते. कुक्कुटपालन क्षेत्राला सामान्य स्थितीमध्ये किंवा पूर्वपदावर आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने अत्यावश्यक सेवा अंतर्गत पशुधन आणि कुकुट उत्पादनांचा पुरवठा घोषित करून कुकुट उत्पादनांची अडथळे मुक्त आंतरराज्य वाहतूक सुरू करून सरकारी पातळीवर धोरणात्मक समर्थन दिले. डॉक्टरांनी covid-19 विषाणूविरुद्ध लढण्यासाठी प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी लोकांना प्रतिनियुक्त खाण्याचा सल्ला दिला. त्यामुळे जून २०२० पासून कोंबडी मांसा आणि अंड्याच्या वाढत्या मागणीमुळे या उद्योगाची परिस्थिती झपाट्याने बदलली. त्याचबरोबर काम करणाऱ्या लोकसंख्येचा मोठा भाग वर्क फॉर्म मोडवर राहिल्याने घरगुती कोंबड्याच्या वापरामध्ये देखील झपाट्याने वाढ झाली आहे. जेव्हा कोविड-19 चे सर्व निर्बंध काढून टाकण्यात आले तेव्हा आरोग्यदायी आणि दर्जेदार पोल्ट्री उत्पादनांची मागणी झपाट्याने वाढली. ज्यामुळे ऑनलाईन रिटेल प्लेयरच्या विक्रीत मोठी वाढ झाली. अनेक ऑनलाईन किरकोळ विक्रेते त्यांच्या साधनांसह तसेच आधुनिक प्रक्रिया सुविधांसह ग्राहकांच्या घरापर्यंत दर्जेदार पोल्ट्री मांसा पोचवण्याचे काम करतात. अशा प्रकारे अनेक शेतकरी अशा अनेक विक्रेत्यांनी देऊ केलेल्या कंत्राटी शेती संकल्पनेची जोडले गेले. पोल्ट्री मांस आणि अंडी यांची मागणी जून २०२० पासून वाढू लागली.

**रशिया युक्रेन युद्ध आणि भारतातील पोल्ट्री उत्पादन व निर्यात :**

युक्रेन मधील युद्धामुळे त्या देशाच्या निर्यातीवर विपरीत परिणाम झाला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर भारत अंडी आणि पोल्ट्री उत्पादन व निर्यात वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहे. युक्रेन देशांचा मोठा निर्यातदार आहे त्या संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबिया या देशांच्या बाजारपेठांमध्ये निर्यात वाढवण्याची सरकारची योजना आहे. युरोपमधील प्रमुख अंडी उत्पादक देशांच्या यादीत अग्रस्थानी नसले तरी एक दशकापूर्वी पर्यंत मध्य आणि पूर्व युरोपसाठी युक्रेन हा महत्त्वाचा पोल्ट्री उत्पादनांचा स्रोत मानला जात होता. युक्रेनियन कंपनी 'अवांगगार्ड' ही युरोप खंडातील सर्वात मोठी अंडी उत्पादक कंपनी आहे. ही कंपनी अंडी व कवचयुक्त अंडी यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करते.

यु. ए. इ. (संयुक्त अरब अमिराती) मध्ये भारतीय पोल्ट्री मांस आणि अंडी यांच्या विक्रीला चालना देण्यासाठी आणि युक्रेनची आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज करण्याच्या भारताचा प्रयत्न आहे. युक्रेन स्टॅटीस्टीकल सर्विसच्या अहवालानुसार, युक्रेनच्या एकूण अंडी निर्यातीपैकी जवळपास 40% वाटा हा संयुक्त अरब अमिरातीचा आहे. डिसेंबर 2021, मध्ये युएई ने गेल्या पाच वर्षांपासून भारताच्या अंडी आणि इतर पोल्ट्री उत्पादनावर असलेली आयात बंदी उठविली आहे. बर्ड फ्लू चा संसर्ग टाळण्यासाठी जागतिक पशु आरोग्य संघटनेने ठरवून दिलेल्या जैव सुरक्षा नियमांचे पालन करणार असल्याचे सरकारने दिलेल्या आश्वासनानंतर आयात बंदी उठवली गेली. या बदललेल्या धोरणामुळे भारताला अंडी उबवलेली अंडी व पिल्ले निर्यात करण्याची परवानगी मिळाली आहे.

 ISBN: 978-93-5780-325-0

भारतातून पक्षांच्या अंड्याची सर्वात मोठी जहाज वाहतूक ओमान आणि मालदीव मध्ये केली जाते. त्यानंतर इंडोनेशिया, व्हिएअतनाम, रशिया आणि जपानचा क्रमांक लागतो. एकूणच मध्यपूर्व ही भारताला पोल्ट्री उत्पादनांसाठी सर्वात मोठी बाजारपेठ आहे. तथापि या प्रदेशातील सर्वात मोठा खरेदीदार असूनही यु. ए. इ ने ऐतिहासिक दृष्ट्या या प्रदेशात वाहतूक केलेल्या पोल्ट्री उत्पादनाचा केवळ एक अंशच खरेदी केला आहे. ही परिस्थिती सुधारण्याची भारताच्या वाणिज्य मंत्रालयाची योजना आहे.

फेब्रुवारीच्या उत्तरार्धात रशियन आक्रमण होण्यापूर्वीच युक्रेनच्या पोल्ट्री उद्योगाला मोठा फटका बसला होता. तर 2021 मध्येच युक्रेनच्या अंडी उत्पादनात २०२० च्या तुलनेत 25% म्हणजे तीन अब्ज अंडी इतकी घसरण झाली. युक्रेन असोसिएशन ऑफ पोल्ट्री प्रोड्युसर यांच्या अहवालानुसार, युक्रेनचा पोल्ट्री स्टॉक गेल्या दोन वर्षात ११ दशलक्ष हेडणे घसरला. तर बॉयलर मांसाचे उत्पादन 40 हजार टनांनी नी घटले आहे. कोविड-19 चा प्रादुर्भाव व त्यानंतर वीज, नैसर्गिक वायू यांचे उच्च दर व खाद्यपदार्थांच्या किमती हे घटक देखील यासाठी कारणीभूत आहेत. असे असले तरीही युक्रेनियन कंपन्यांनी युएई व इतर बाजारपेठांच्या बाबतीत युद्ध सुरू होईपर्यंत पुरवठ्यातील मक्तेदारी कायम ठेवली होती

**भारतातील पोल्ट्री व्यवसायाला चालना मिळण्याची शक्यता :**

सरकारच्या अंदाजानुसार भारतातील वार्षिक अंडी उत्पादन आठ टक्के दराने वाढत आहे. तमिळनाडू हे भारतातील सर्वात मोठे अंडी निर्यात करणारे राज्य आहे. भारतातील अंडी निर्यातीमध्ये तमिळनाडूचा वाटा निम्म्यापेक्षा अधिक आहे. त्या पाठोपाठ महाराष्ट्र आणि केरळचा क्रमांक लागतो. अंडी निर्यातीत या प्रमुख तीन राज्यांचा वाटा 95 टक्के इतका मोठा आहे.

भारतातील छत्तीसगड, पश्चिम बंगाल आणि आंध्र प्रदेशातही पोल्ट्री क्षेत्र वेगाने वाढ होत आहे. या व्यवसायासाठी अजूनही भारताला मोठी संधी आहे. कारण अंडी हा देशातून निर्यात केल्या जाणाऱ्या पदार्थांमध्ये ६२९ व्या क्रमांकाचा निर्यात केला जाणारा घटक आहे.

कृषी प्रक्रिया उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणानुसार आर्थिक वर्ष २०२१ मध्ये पोल्ट्री उत्पादकांची निर्यात ७१ दशलक्ष डॉलर इतकी होती. सन २०२०-२१ मध्ये ही निर्यात ५१.७ दशलक्ष डॉलर इतकी होती. मागील वर्षाच्या तुलनेत ही वाढ २१ टक्के इतकी आहे.

**निष्कर्ष :**

वाढत्या लोकसंख्येमुळे अंडी व मांस यांच्या सातत्याने वाढणाऱ्या मागणीमुळे भारतातील पोल्ट्री व्यवसायाला विस्तारित संधी निर्माण झाली आहे. तसेच कोविड-१९ च्या परिस्थितीतून अर्थव्यवस्थेबरोबरच भारतातील पोल्ट्री व्यवसाय देखील पूर्वपदावर येत आहे. तसेच युक्रेन युद्धामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला पोल्ट्री उत्पादनांच्या निर्यातीसाठी सुसंधी निर्माण झाली आहे.

**संदर्भसूची:**

https://www.moneycontrol.com
https://www.dahd.nic.in
https://www.researchgate.net/publication/